| | |
|---|---|
| | **अंतरिम पोटगीचा आदेश नि.क्र.१३**<br>**रिजवाना वगैरे विरुध्द मिनाज वगैरे**<br>**CNR No.MHLA060012782022** |

०१. अर्जदार क्र.०१ ते ०४ यांनी सदरचा अर्ज त्यांचे पालन पोषण करण्याकरीता गैरअर्जदार क्र.०१ कडून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/- एवढी अंतरीम पोटगी मुळ अर्ज निकाली निघेपर्यंत मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदार क्र.०१ हिचे कथन असे आहे की, अर्जदार क्र.०१ ही गैरअर्जदार क्र.०१ ची पत्नी असून, त्यांचे लग्न दिनांक २०/०४/२००६ रोजी मुस्लीम रितीरीवाजाप्रमाणे निजामाबाद, ता. व जि. निजामाबाद येथे पार पडले. त्या दोघांचे वैवाहीक नाते अद्यापही कायम आहेत. अर्जदार क्र.०१ हिस गैरअर्जदार क्र.०१ पासून तीन मुले अनुक्रमे अर्जदार क्र.०२ फैजान, अर्जदार क्र.०३ इमरान व अर्जदार क्र.०४ उमान हे झाले आहेत. गैरअर्जदार क्र.०२ ही अर्जदार क्र.०१ ची सासू आहे तर अर्जदार क्र.०३ ते ०६ हे अर्जदार क्र.०१ चे दिर असून गैरअर्जदार क्र.०७ ही अर्जदार क्र.०१ ची ननंद आहे. लग्न झाल्यानंतर अर्जदार क्र.०१ ही गैरअर्जदार क्र.०१ सोबत नांदावयास त्याच्या राहत्या घरी निजामाबाद येथे गेली.

०३. अर्जदार क्र.०१ ने पुढे असे कथन केले की, लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार क्र.०१ ते ०७ यांनी अर्जदारास कसे तरी एक वर्ष चांगले नांदविले. त्यानंतर अर्जदार क्र.०१ हिस गैरअर्जदार क्र.०१ ते ०७ यांनी तुझ्या माहेरच्यांनी लग्नामध्ये आमचे मानपान केले नाही, तु वागायला चांगली नाहीस, तु आमच्या खानदानाचे बरोबरीची नाहीस, म्हणून

अर्जदार क्र.०१ हिचे चारित्र्यावर संशय घेऊन वरील सर्व गैरअर्जदार हे अर्जदारास लाथा बुक्क्यांनी, बेल्टने मारहाण करुन उपाशी पोटी ठेवत असत. तसेच अर्जदार क्र.०१ ही ०३ महिन्याची गरोदर असताना तिचा जबरदस्तीने गर्भपात केला. तसेच गैरअर्जदार क्र.०१ ते ०७ हे अर्जदारास माहेरहून ट्रान्सपोर्टचा व्यवसाय टाकणेसाठी रुपये १०,००,०००/- रुपये माहेरहून घेऊन ये, म्हणून सतत छळ करीत असत. त्यांची मागणी पुर्ण न केल्यामुळे अर्जदार क्र.०१ हिला गैरअर्जदार ह्यांनी त्रास, छळ व जाच जूलूम करुन डिसेंबर २००७ मध्ये तिला मारहाण करुन तिचे अंगावरील पाच तोळे सोन्याचे दागिने काढून घेऊन घरातून हाकलून दिले. तेंव्हापासून अर्जदार ही तिचे आई वडिलाकडे अहमदपूर येथे राहत आहे. अर्जदार ही अहमदपूर येथे आई वडीलांकडे असताना, एक महिन्याने गैरअर्जदार क्र.०१ तिच्या माहेरी आला आणि त्याला सौदी अरेबीयाला जाण्यासाठी लागणारा खर्च दिल्यास ते अर्जदाराला तलाक देणार नाही, असे म्हणले. करीता अर्जदाराच्या आई वडिलांनी त्याला जाण्याचा खर्च दिला.

०४. अर्जदार क्र.०१ ने पुढे असे कथन केले की, गैरअर्जदार क्र.०१ हा सौदी अरेबीयाला होता, तेंव्हा अर्जदार क्र.०१ ते ०४ यांचे उपजिवीकेसाठी व पालन पोषणासाठी दरमहा रुपये १५,०००/- अर्जदार क्र.०१ हिचे खातेवर सन २०१७ पर्यंत पाठवत होता. त्यानंतर गैरअर्जदार क्र.०१ हा सौदी अरेबीयाला गेलेला नाही व तो अहमदपूर येथे सुध्दा अर्जदार क्र.०१ सोबत राहिलेला नाही. तसेच अर्जदार क्र.०१ ते ०४ यांच्या पालनपोषणाचा खर्च सुध्दा देत नाही. म्हणून फेब्रूवारी २०२१ मध्ये गैरअर्जदारांना त्याबाबत बैठकीसाठी अहमदपूर येथे बोलावले. सदर बैठकीमध्ये अर्जदार क्र.०१ ते ०४ यांचे उपजीवीकेचा व

पालनपोषणाचा तसेच अज्ञान अर्जदारांच्या शिक्षणाचा खर्च करण्याबद्दल विचारणा केली असता, गैरअर्जदारांनी त्यांचा खर्च करणेस नकार दिला. गैरअर्जदार क्र.०१ याचे निजामाबाद येथे ट्रान्पोर्टचा व्यवसाय असून त्याच्याकडे ४ ट्रक, शेती आणि खुले प्लॉट आहेत. त्यातून त्याला दरमहा ३ लाख रुपये उत्पन्न मिळते व तो अर्जदारास ५,०००/– रुपये प्रत्येकी अंतरीम खावटी देऊ शकतो. अर्जदारांचा उदरनिर्वाह व उपजिवीकेसाठी उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे तिने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०५. गैरअर्जदार क्र.०१, ०२, ०४ आणि ०७ यांनी त्यांचे सदर अर्जावरील म्हणणे दाखल केले व अर्जदाराने गैरअर्जदारांवर लावलेले संपूर्ण आरोप फेटाळले. गैरअर्जदारांना, गैरअर्जदार क्र.०१ व अर्जदारा यांचे लग्न व त्यातून जन्माला आलेले मुले हे मान्य आहेत. तसेच, ते दोघेही विभक्त राहतात, ही बाब देखील मान्य आहे.

०६. गैरअर्जदारांच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र.०१ याचे अर्जदार क्र.०१ हिच्याशी लग्न झाल्यापासून तो अहमदपूर येथे राहत होता व कामधंदा करीत होता. त्याने स्वतःच्या मेहनतीने अहमदपूर येथे प्लॉट खरेदी केला होता व बांधकाम करुन त्यांचा आनंदाने संसार चालू होता. त्याने कधीच अर्जदार क्र.०१ हिला मानसिक, शारीरीक त्रास दिला नाही. सौदी अरेबीयाला कामाकरीता गेला, त्या काळात त्याने एकूण रक्कम रुपये १५,५६,७२६/– एवढी अर्जदार क्र.०१ हिच्या नावे बँकेत खात्यावर पाठविली. परंतु, ते सर्व पैसे अर्जदाराने व तिच्या आई वडिलांनी मिळून खर्च केले. गैरअर्जदार क्र.०१ हा भारतात राहण्यासाठी आला तेंव्हा अर्जदार हिने तिच्या आई वडिलांच्या सांगण्यावरुन गैरअर्जदाराचा अपमान करणे, उलटे बालणे, टाकून बोलणे असा त्रास देण्यास सुरुवात

केली व अर्जदाराच्या आई वडिल व भावांनी गैरअर्जदार क्र.०१ यास त्याने बांधलेल्या घरातून हाकलून दिले. तसेच, त्यांच्यावर कलम ४९८ (अ) खाली खोटा गुन्हा दाखल केला.

०७. गैरअर्जदार क्र.०१ याचा ट्रान्सपोर्टचा कसल्याही प्रकारचा उद्योग नाही, त्याच्या नावे शेती नाही, खुले प्लॉट नाही. गैरअर्जदार क्र.०१ हा सध्या हालाकीचे जीवन जगत असून मोल मजुरी करुन दिवस काढत आहे. त्याला महिन्यालया ४,०००/– ते ५,०००/– मिळवणी व पोटाची खळगी भरणे दुरापास्त झाले आहे. याउलट अर्जदार ही घरामध्ये किराणा दुकानाचा व्यवसाय व कपडे शिलाईची मशिन चालविते आणि प्लॉट मधील ४ रुम भाड्याने देऊन महिन्याला ८०००/– ते १००००/– घरभाडे येते. अशाप्रकारे ती आपल्या ३ मुलांसह आनंदाचे जिवन व्यथीत करत आहे आणि तिला कोणतीही अंतरिम पोटगीची आवश्यकता नाही. तो आजही अर्जदारास नांदविण्यास तयार आहे.

०८. अर्जदारांचा अर्ज व त्यावर गैरअर्जदारानी दाखल केलेले उत्तर याचे अवलोकन केले. त्यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार व गैरअर्जदार क्र.०१ यांनी शपथेवर दाखल केलेले संपत्ती व दायीत्व यांचे माहितीचे अवलोकन केले. गैरअर्जदारांना, अर्जदार व गैरअर्जदार क्र. ०१ त्यांच्यातील विवाह व ते दोघेही सध्या विभक्त रहात आहे, हे मान्य आहे. तसेच सदर लग्नातून जन्माला आलेले ३ अपत्ये देखील मान्य आहेत. अर्जदाराने दाखल केलेले शपथेवरील अर्जात गैरअर्जदारांनी तिच्यावर नानाप्रकारे केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराचा उल्लेख केलेला आहे. गैरअर्जदारांनी, अर्जदाराने त्यांच्यावर केलेल्या आरोपाचे

जरी खंडण केले असले तरी अर्जदाराचे शपथेवरील दाखल केलेल्या अर्जातील कथनांवरून प्रथमदर्शी असे दिसून येते की, गैरअर्जदारांनी वेगवेगळ्या कारणावरुन अर्जदाराचा कौटुंबिक छळ केला आहे व अर्जदार हिला त्यांचे घरातून हाकलून दिले आहे व तेंव्हापासून अर्जदार ही तिच्या मुलांसह गैरअर्जदारांपासून विभक्त रहात आहे.

०९. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र.०१ याने सन २०१७ पर्यंत अर्जदारांना दरमहा १५,०००/– रक्कम तिचे खात्यावर जमा केल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यानंतर तिचे आणि तिच्या मुलांचे भरण पोषणासाठी कुठलीही रक्कम किंवा आर्थिक मदत केल्याचे प्रथमदर्शी दिसून येते नाही. अर्जदाराने तिच्या अर्जाच्या पृष्ठयार्थ काही कागदपत्रे निशाणी क्र.०४ खाली दाखल केले आहे. त्यापैकी प्रथम छापील खबर अहवाल, गुन्हा क्र.४९/२०२२ याचे अवलोकन केले असता, गैरअर्जदारांनी तिचा नाना प्रकारे मानसिक आणि शारिरीक छळ केला असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र.०१ ने साल २०१७ नंतर अर्जदारांचे पालणपोषणाची व्यवस्था केली याबाबत कुठलाही तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. अर्जदारांचे पालन पोषण करणे गैरअर्जदार क्र.०१ ची नैतीक जबाबदारी आहे. करीता गैरअर्जदार क्र. ०१ अर्जदारांना पोटगी देण्यास जबाबदार आहे. इतर गैरअर्जदारांना सदरच्या जबाबदारीकरीता ग्राह्य धरता येणार नाही.

१०. अर्जदारांचे कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र.०१ याचेकडे निजामाबाद येथे ट्रान्पोर्टचा व्यवसाय असून त्याच्याकडे ४ ट्रक, शेती आणि खुले प्लॉट आहेत. त्यातून त्याला दरमहा ३ लाख रुपये उत्पन्न मिळते. करीता, तो अर्जदारांना अंतरीम खावटी देऊ शकतो. परंतु, अर्जदराने तिच्या कथनास पूरक असे काहीही दस्तऐवज अभिलेखावर सादर

केलेले नाही. याउलट गैरअर्जदाराने दाखल केलेले मालमत्ता व दायीत्व च्या माहितीमध्ये शपथेवर कथन केले की, त्यास महिन्याकाठी ७,०००/– रुपये एवढे उत्पन्न आहे व त्याचे स्वकष्टार्जित घर आहे. करीता, गैरअर्जदाराने शपथेवर केलेले आर्थिक आवक याबाबतचे कथन बघता, त्यास दरमहा ७,०००/– रुपये मजुरीच्या कामातून मिळत असल्याचे दिसून येते. तसेच अर्जदार हिला कमाईचे साधन असल्याचे गैरअर्जदार यांनी दाखवून दिले नाही व शपथेवरील दाखल केलेल्या दायीत्व व मालमत्ता या माहितीत अर्जदार ही कमवीत नसल्याचे कथन केले आहे. सदरचा अर्ज हा अत्यंत प्रारंभीक टप्प्यावर असून मुळ अर्ज निकाली लागण्यास वेळ लागू शकतो. करीता, आजची महागाई बघता तिचे स्वतः व मुलांकरीता पालनपोषण मिळणेस ती पात्र आहे. करीता, अर्जदाराचे व गैरअर्जदार क्र.०१ याचे राहणीमान व उत्पन्नाचे स्त्रोत बघता, अर्जदार खालील प्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेः–

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ ते ०४ यांना महिन्याकाठी रक्कम ८००/– रुपये प्रत्येकी एवढी अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

ठिकाणः अहमदपूर
दिनांकः १२.०२.२०२४.

**(सौ. ए.एस. जरुदे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), अहमदपूर.